जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०४/०१०/२०२३
## दि.०३/१०/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पर्वती पो स्टे ३०१/२०२३,भादविक ३९३,४५२ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ५४ वर्षे,रा.घर नं ४३१,दत्तवाडी,पुणे |
| **आरोपीत** | एक अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०९/२०२३ रोजी रात्री १०/२२ वा.व दि.०३/१०/२०२३ रोजी सकाळी ०८/०० वा. चे दरम्यान घर नं.४३१,दत्तवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया दि.२८/०९/२०२३ रोजी रात्री १०/२२ वा.त्यांचे राहते घरी असताना एक अनोळखी इसमाने फिर्यादी यांचे राहते घरात बळजबरीने घुसला. त्यावेळी फिर्यादी हे ओरडु लागले असता,त्याने फिर्यादी यांचे तोंड दाबुन त्यांना चापट मारून,त्यांना देवघरात ओढत नेवुन,फिर्यादी यांचे हातातील बांगडया फोडुन,त्यांचे हातावर कसल्यातरी धारदार हत्याराचे साहाय्याने मारून,फिर्यादी यांचे घरातील चोरीचे उद्देशाने कपाट उघडण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच फिर्यादी हया दि.०३/१०/२०२३ रोजी सकाळी ०८/०० वा.त्यांचे राहते घरी असताना,एका अनोळखी इसमाने फिर्यादी यांचे बिल्डींग मधील जिन्या मधुन येवुन,फिर्यादी यांचा हात पकडुन,त्यांचे हातावर कसल्यातरी धारदार हत्याराने मारून परत जिन्याने फिर्यादी यांचे राहते घराचे बिल्डींगचे टेरीसकडे पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.टी.जगदाळे ९६५३६९३६१२ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ४८३/२०२३,भादविक ३०८,५०४,३४ |
| **फिर्यादी** | साहील शेख,वय-२३ वर्षे,रा.रामनगर,रामटेकडी,हडपसर,पुणे |
| **आरोपीत** | दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/१०/२०२३ रोजी रात्री ०८/३० वा.पॉप्युलर जिम समोर अण्णाभाऊ साठे उद्याना जवळ स.नं.१०८/१०९,रामनगर,रामटेकडी,हडपसर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचा भाऊ अकील साबीर शेख,वय-२२ वर्षे याचेसह चहा पिण्यासाठी जात असताना,यातील नमुद इसमांनी आपसात संगनमत करून,अकील शेख यास तु आमच्याकडे का बघतोस असे म्हणून त्यास शिवीगाळ करून,त्याचे पोटात चाकु मारण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्याचे उजवे हाताला चाकु लागुन जखम झालेली आहे. सदरवेळी फिर्यादी हे भांडणे सोडविण्यासाठी मध्ये गेले असता,सदर इसमांनी त्यांचे हातातील चाकुने फिर्यादी यांचेवर वार करीत असताना,सदरचा चाकु त्यांचे पोटाला घासुन खरचटुन,त्यांना दुखापत झाली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. माया गावडे ८५९१४१५०२८ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापी पो स्टे ६२८/२०२३,भादविक २७९,३०४(अ),मो.वा.का.क.११९/१७७,१८४ |
| **फिर्यादी** | रामसिंग परिहार,वय-४२ वर्षे,रा.मानाजी नगर,न-हे,पुणे |
| **आरोपीत** | मोपेडवरील महिला (अटक नाही) |

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दिनांक ०२/१०/२०२३ रोजी १७/३० वा.बाबजी पेट्रोल पंप आंबेगाव,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी यांचा चुलत भाऊ मदन नवराज परिहार,वय-२७ वर्ष,रा.सार्थक शांतीबन सोसायटी,बालाजीनगर,पुणे हे पायी जात असताना,यातील नमुद महिला हिने तीचे ताब्यातील दुचाकी ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन, नमुद ठिकाणी पादचारी मदन परिहार यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून, त्याचे मृत्युस कारणीभुत झाली आहे.

**त.अंमलदार** श्रेणी पो.उप.निरी. मोहन देशमुख ९७६५३९०९४३

**४**

**पो.स्टे.गुरनं./कलम** येरवडा पो स्टे ६६९/२०२३,भादविक २७९,३०४(अ),३३७,३३८,मोटर वाहन का.क.१३४(अ)(ब), १८४,११९/१७७.

**फिर्यादी** मनाली खरचंद,वय २४ वर्षे,रा.महाराष्ट्र हौसिंग बोर्ड,येरवडा,पुणे

**आरोपीत** टेम्पोवरील चालक (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दिनांक ०२/१०/२०२३ रोजी १८/०० वा.शांती रक्षक सोसायटी गेट समोरील ईशान्य मॉल रोडवर,येरवडा,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी हया त्यांचा भाऊ यश बाळासाहेब खरचंद,वय-१८ वर्षे व बहीण मयुरी,वय-२६ वर्षे यांचेसह ऑटो रिक्षामधुन त्यांचे राहते घरी जात असताना,यातील नमुद टेम्पोवरील चालकाने त्याचे ताब्यातील टेम्पो हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व मानवी जिवितास धोका निर्माण होईल अशा रितीने चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी हया जात असलेल्या रिक्षास समोरून जबर धडक देवुन,फिर्यादी हया स्वतः त्यांची बहीण मयुरी, भाऊ यश खरचंद व रिक्षाचालक अरविंद जाधव या सर्वाना दुखापत करून,यश खरचंद यास गंभीर दुखापत करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता, अपघाताची खबर न देता पळुन गेला.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. विष्णु होले ८८८८८७४१४३

**५**

**पो.स्टे.गुरनं./कलम** हडपसर पो स्टे १५०१/२०२३,भादविक २७९,३०४(अ),मो.वा.का.क.१८४,१३४(अ)(ब)

**फिर्यादी** श्रीराम नायर,वय-२० वर्षे,रा.काळेपडळ,ससाणेनगर,हडपसर,पुणे

**आरोपीत** अज्ञात वाहन चालक (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दिनांक ०१/१०/२०२३ रोजी २०/३० वा.निर्मल टाऊनशिप समोरील ससाणेनगर,काळेपडळ, हडपसर,पुणे येथे सार्वजनिक रस्त्यावर

**तपशिल** यातील फिर्यादी यांचे वडील रविंद्रनाथ रामनकुट्टी नायर,वय-५९ वर्षे,रा.निर्मल टाऊनशिप, काळेपडळ,ससाणेनगर,हडपसर,पुणे हे मोटार सायकलवरून जात असताना,यातील नमुद अज्ञात वाहन चालकाने,त्याचे ताब्यातील वाहन हे वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी मोटार सायकलस्वार रविंद्रनाथ नायर यांना जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. अमोल कामठे ९५५२५६७४०४

**६**

**पो.स्टे.गुरनं./कलम** बंडगार्डन पो स्टे ३०८/२०२३,भादविक २२४

**फिर्यादी** आदेश शिवणकर, पोलीस हवालदार, मुख्यालय,शिवाजीनगर,पुणे

**आरोपीत** ललित अनिल पाटील,वय-३४ वर्षे,रा.येरवडा कारागृह,पुणे (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दिनांक ०२/१०/२०२३ रोजी १९/३५ वा. ससुन हॉस्पीटल,पुणे वार्ड क्र.१६ येथुन

**तपशिल** यातील फिर्यादी हे ससुन हॉस्पीटल,वॉर्ड नंबर १६ (प्रिझनर्स वॉर्ड) येथे गार्ड ड्युटीसाठी हजर असताना,फिर्यादी हे नमुद इसमास ससुन हॉस्पीटल वार्ड क्र.१६ येथुन एक्सरे विभागाकडे घेवुन जात असताना,सदर इसमाने फिर्यादी यांचे हाताला हिसका मारुन,त्यांचे कायदेशीर रखवालीतुन पळुन गेला आहे.

**त.अंमलदार** सहा.पोलीस निरीक्षक, संदीप मधाळे ९४२२४२७८४७

## दि.०४/१०/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १५०५/२०२३,भादविक ३०४(अ),२७९,मो.वा.का.कलम ११९/१७७ |
| **फिर्यादी** | संतोष देशमुख,वय ४५ वर्ष,रा.स.नं.२६६,माळवाडी,हडपसर,पुणे |
| **आरोपीत** | शिवशाही एस.टी. बसवरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/१०/२०२३ रोजी रात्रौ २०/१६ वा.रूकारी पेट्रोल पंपा समोरील सिग्नल जवळ,मांजरी, ता.हवेली,जि.पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची चुलती श्रीमती.शकुंतला भरत देशमुख,वय-७५ वर्षे,रा.शेवाळवाडी, मांजरी,ता.हवेली,जि.पुणे हया नमुद ठिकाणी पायी रस्ता ओलांडत असताना,यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील शिवशाही एस.टी. बस ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी पादचारी महिला श्रीमती. शकुंतला देशमुख हिस जबर ठोस मारून,तीस गंभीर जखमी करून,तीचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अशोक गांधले ९३७००७६३०५ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ४८५/२०२३,भादविक ३०७,५०६,भारतीय हत्यार कायदा कलम ४,(२५) |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-४८ वर्ष,रा.फतिमानगर,वानवडी,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०३/१०/२०२३ रोजी अंदाजे रात्री २१/४५ वा.फिर्यादी यांचे राहते घराचे मागे मुक्तानंद सोसायटी,रो-हाऊस नं.१४,डायमंड बेकरी गल्ली,फतिमानगर,वानवडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे पती जावेद इस्माईल मुजावर,वय-५१ वर्ष,रा.डायमंड बेकरी गल्ली, फतिमानगर,वानवडी,पुणे हे कामावरुन घरी आल्यानंतर रो-हाऊस मध्ये पत्र्याचे खोली मध्ये दारु पित बसले असताना,फिर्यादी यांचे पतीचा मित्र यातील नमुद इसमाने अज्ञात कारणावरून फिर्यादी यांचे घरी येवुन बागेत झाडे कापण्यासाठी वापरत असलेली लोंखडी कु-हाडीने जावेद मुजावर यांचे डावे बाजुला कानाच्यावरती तसेच डोक्याच्या मध्यभागी,उजव्या हाताच्या कोपरचे खाली वार करुन त्यांना जीवे ठार मारण्याचे उद्देशाने गंभीर जखमी केले. तसेच सदर इसम हा फिर्यादी यांचे घरातुन पळुन जावुन,जाताना पोलीसात तक्रार केलीतर फिर्यादीस बघुन घेण्याची धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, राहुल गिरमकर ८८०५७३७३३ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**